# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गो.वि.ग./म.वि.वि.वि./१७४ /२०२६ दि. ०६ /०२/२०२६

## परिपत्रक

विषय:- ई-समर्थ प्रणालीव्दारे Affiliation Module मध्ये Online Affiliation Application संदर्भात दि. ०७/०२/२०२६ रोजी आयोजित कार्यशाळेबाबत.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ (त्र)(ट), १०८ व ११४ मधील तरतुदीनुसार व विद्यापीठ निदेशानुसार विद्याविषयक लेखापरिक्षण पध्दतीने संलग्नित महाविद्यालयांचे संलग्निकरण चालू ठेवण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. त्याअनुषंगाने ई-समर्थ प्रणालीव्दारे Affiliation Module ची पुढील प्रक्रिया ही Online Affiliation Application असून सदर प्रक्रियेच्या माध्यमातून विद्याविषयक लेखापरिक्षण करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रिया करतांना संलग्नित महाविद्यालयांना अडचणी निर्माण होऊ नये याकरीता **दि. ०७/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजता चंद्रपूर जिल्हा आणि दुपारी २.३० ते ४.३० वाजता गडचिरोली जिल्हा असे दोन पाळीमध्ये मा. प्र-कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठातील अल्फा ॲकॅडमी (जुनी प्रशासकीय इमारत) येथे कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे.**

करीता विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्रतिनिधी यांनी दिनांक ०७/०२/२०२६ रोजी आयोजित कार्यशाळेला उपस्थित राहावे. जेणेकरुन आपल्या महाविद्यालयाचे संलग्निकरणाकरीता Online Affiliation Application करतांना अडचणी येणार नाही. करीता नोंद घ्यावी.

मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने,

( श्री. दिनेश नरोटे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी :-

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. नोडल अधिकारी, ई-समर्थ प्रणाली, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.